# शेळीपालनाची पंचसूत्री

प्रा. के. एल. जगताप
विषय विशेषज्ञ
डॉ. तुकेश सुरपाम
विषय विशेषज्ञ
डॉ. अजय किनखेडकर
कार्यक्रम समन्वयक
पशू संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

शेळीपालन हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील, शेतकरी, शेतकरी महिला, अल्पभूधारक ज्याच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन नाही अशासाठी हा एक व्यवसाय केला जात होता. हा व्यवसाय चालू करताना लागणारे कमी भांडवल, तसेच याच्या पदार्थास असलेली बाजारपेठेतील प्रचंड मागणी, यामुळे शेतकरी वर्ग या व्यवसायाकडे आकर्षिला जावू लागलेला आहे. शेळीपालन हा व्यवसाय करत असताना पंचसूत्रीचा अवलंब केल्यास शेळीपालन हा व्यवसाय अधिक फायदेशीर होईल यात काहीच शंका नाही. व्यवसाय करत असताना खालील पंचसूत्रीचा अवलंब करावा,

अ. जातीची योग्य निवड
आ. आहाराचे व्यवस्थापन
इ. गोठा बांधणी व त्याचे व्यवस्थापन
ई. आरोग्याचे व्यवस्थापन
उ. विक्री व्यवस्थापन

## अ. जातीची योग्य निवड:

महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे ज्या-ज्या विभागाला मानवेल अशाच शेळीची पैदास करून त्या शेळीची निवड करतात. महाराष्ट्रातील विभागामध्ये सूट होणाऱ्या अशाच जाती संशोधन करून काढल्या आहेत.

- पुणे, नाशिक व अहमदनगर या जिल्ह्यांसाठी संगमनेरी ही जात खास (दुहेरी उद्देशासाठी) मांसासाठी व दुधासाठी उत्पादित केली आहे.
- विदर्भासाठी बेरारी - बेरारी जातीच्या तपकिरी रंगाच्या शेळ्या दिसून येतात. त्याचबरोबर प्रचलित नसलेल्या मात्र मोठ्या प्रमाणावर संख्या असलेल्या काठेवाडी जातीच्या शेळ्या खानदेशातील धुळे, शिरपूर, साक्री या भागात, सातपुडा पर्वतालगत दिसून येतात. तर कोंकणासाठी कोकण कन्याळ या जाती संशोधीत केल्या आहेत.
- मराठवाड्याकरिता उस्मानाबादी नावाची जात, ही खास मांसासाठी उत्पादित केली आहे. उस्मानाबादीची निवड करत असताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

### नराची निवड:

खरेदी हिवाळी हंगामातच करावी. पावसाळ्यात रोगाचा प्रादुर्भाव असतो. पैदाशीसाठी बोकड हा जुळ्यापैकीचा असावा. वय हे १ - १.५ वर्षे असावे. चपळ व तडफदार असावा. छाती भारदार, मजबूत बांधा, मान जाडसर व मानेवर सिंहासारखे आयाळ. जुळ्या किंवा तिळ्या करडातील एक असून शक्यतो नरच असावेत. डोळे मोठे व पाणीदार, नाकपुड्या या ओलसर व मोठ्या असाव्यात. ओठ बारीक असावेत. पाय हे काटक असावेत, पुढच्या दोन पायातील अंतर हे जास्त असावे ९" पेक्षा जास्त. नराचे वय २ - ३ वर्ष ३० माद्यासाठी, दर २ वर्षांनी नर बदलत जावा. अंडाशय जास्त लोंबते नसावे. अंडाषयातील दोन्ही वृषणे सुस्थितित असावीत.

### मादीची निवड:

विभागामध्ये सूट होणारी असावी. शेळीपालकाकडूनच जातीवंत शेळीची खरेदी. दोन वर्ष वयाच्या माद्या खरेदी कराव्यात (२ – ४ दाती). स्वभावाने गरीब असावी, पिल्लांना शांतपणे पिऊ देणारी असावी. नियमित माजावर येणारी असावी. दोन वर्षात ३ वेळा विणारी असावी. प्रत्येक वितात २ - ३ करडे देणारीच असावी, १ करडू देणाऱ्याची निवड करू नये. शेळीची लांबी, रुंदी, योग्य असावी. केस चमकदार, डोळे पाणीदार, व शेपटी हि उभी असावी. पाय सरळ असावेत, मागील पायात पुरेसे अंतर असावे. कासेची ठेवण चांगली असावी. दुग्धोत्पादन चांगले असावे.

## आ. आहाराचे व्यवस्थापन:

### मोठ्या शेळ्या:

प्रतिदिन ३-४ किलो हिरवा चारा. ४०० - ५०० ग्रॅम कोरडा चारा. २००-२५० ग्रॅम खुराक. आहारामध्ये खनिज व जिवनसत्वाचा समावेश करावा. ज्वारी, लसूणघास, दशरथ, बरशीम, बोर, बाभुळ, चिंच, आंबा, वड, करंज चारा म्हणून. शेळी माजावर येताना व गर्भधारणेच्या ६ - ८ आठवड्याच्या काळात खाद्याचे व खुराकाचे प्रमाण वाढवावे.

### दूध देणाऱ्या शेळ्या:

शेळ्या व्याल्यानंतर ३ – ४ दिवस गव्हाचा कोंडा आंबवण म्हणून द्यावा. एका ली. दुधासाठी ३०० - ४०० ग्रॅम जास्तीचा खुराक द्यावा. खुराकामध्ये पेंड खावयास दिल्यास स्निग्धांशाचे प्रमाण वाढते.

### करडांचा आहार:

करडू जन्मल्याबरोबर एक तासाच्या आत चिक मिळणे आवश्यक आहे. चिक हा करडाच्या वजनाच्या १०% २ – ३ वेळा विभागून द्यावा. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ति वाढते. दिड महिन्यांनंतर कोवळी वनस्पती द्यावी. तीन महिन्याचे झाल्यावर दूध पाजणे हळूहळू कमी करावे, हिरवा, खुराकाचे प्रमाण वाढवावे. (१ महिना ५० - १०० ग्रॅम खादय, २ महिना - १०० - १५०, ३ महिना २०० - २५०, ३ महिन्यानंतर ३५० - ५०० ग्रॅम तर वाढत्या

करडासाठी १२५ - १५० ग्रॅम हिरवी वैरण, २५० ग्रॅम वाळलेला चारा, १२५ - १५० ग्रॅम खुराक द्यावा. हिरव्या चाऱ्यात लसूणघास, चवळी यांचा समावेश करावा.

### बोकडांचा आहार:

प्रजोत्पादनासाठी दररोजच्या आहारात ८०० - १००० ग्रॅमपर्यंत खुराक वाढवून द्यावा. त्यामुळे बोकडाची फळविण्याची क्षमता टिकून राहील व विर्यातील शुक्रजंतूचे प्रमाण कमी होणार नाही.

### आहारावरील खर्च कमी करणेकरिता काही महत्वाच्या बाबी:

- शक्यतो बंदिस्त शेळीपालन टाळावे.
- शेळी आपली ७० ते ८० टक्के भूक ही द्विदल चाऱ्यावर भागविते. ही नैसर्गिक क्षमता लक्षात घेऊन शेळ्यांच्या आहारात जास्त प्रमाणात झाडपाल्याचा वापर करावा.
- शेळीपालन करण्यापूर्वी आपल्या शेताच्या बांधावर तसेच जेथे जेथे मोकळी जागा आहे त्या ठिकाणी लिंब, बाभूळ, सुबाभूळ, हादगा, शेवगा अशी दुहेरी उपयोगाची झाडे बेहडा, अर्जुन अशा निरनिराळ्या झाडांची लागवड करावी.
- आपल्या शेतात उत्पादित होणारी सर्व दुय्यम उत्पादने उदा. कडबा या सर्व गोष्टींचा शेळ्यांच्या आहारात जास्तीत जास्त वापर करावा.
- शेळ्यांना हिरवा चारा घालताना त्यातील पाण्याचे प्रमाण ६० ते ७० टक्केपेक्षा जास्त असू नये.
- शेळ्यांना चारा देताना कुट्टी करून गव्हाणीतुनच द्यावा. शक्य असल्यास हरभऱ्याच्या पेंढा टांगून ठेवा म्हणजे हरभऱ्याचा वापर पूर्ण क्षमतेने होईल व चाऱ्यावरील खर्च आपोआप कमी होईल.
- शेळ्यांना खाद्य देताना विकतचे खाद्य देणे टाळावे. शेळ्यांच्या खाद्याची गरज आपल्याकडे उपलब्ध असलेले गहू, मका, सातू, कडधान्याची चुणी यांच्याद्वारे भागवावे.

### इ. गोठा बांधणी व त्याचे व्यवस्थापन:

शेळ्यांना विशिष्ट अशा प्रकारच्या गोठ्याची आवश्यकताच नसते. मात्र, जास्त ऊन, वारा, पाऊस, हिंस्त्र श्वापदे यांपासून संरक्षण करण्यासाठी कमीतकमी खर्चात उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करून शेळ्यांसाठी सुयोग्य गोठा बनवावा. अतिपावसाच्या प्रदेशात शेळीपालक आपल्या गोठ्यात माचणाचा वापर करतात. अतिपावसाच्या प्रदेशात माचणाचा वापर इष्ट ठरतो. गोठ्याच्या व्यवस्थापनात प्रामुख्याने मलमूत्राचा नीट निचरा होण्याची काळजी घ्यावी, गोठा कोरडा राहण्यासाठी चुन्याच्या भुकटीचा वापर करावा, गोठा दररोज झाडून घ्यावा तसेच गोठ्यातील खाचखळगे वेळच्यावेळी भरून काढावेत. गोचीड, पिसवा यांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी महिन्यातून १ ते २ वेळा गरजेनुसार गोठा स्वच्छ करून गोचीड व पिसवांचे नियंत्रण करावे.

- गोठ्याची जमीन ही मुरमाड असावी. गोठा हा थोड्या उंचीवर, पाण्याचा व्यवस्थित निचरा होणाऱ्या जमिनीवर असावा. गोठा बांधत असताना गोठ्याची लांबी ही पूर्व - पश्चिम दिशेस असावी. उष्ण वातावरण असेल तर पूर्व-पश्चिम व जर वातावरण दमट असेल व शेड लवकर वाळत नसेल तर गोठा दक्षिण - उत्तर असावा.
- गोठ्यामध्ये दिवसभर प्रकाश, हवा खेळती राहण्यास मदत होते. त्यामुळे गोठा हमेशा कोरडा ठेवावा. जमीन ही मुरूम, त्यावर लाकडाचा भुस्सा किंवा विटा यांनी धुमसून घ्यावी. या प्रकारची जमीन हिवाळ्यात उबदार राहत असल्यामुळे करडांचे व शेळ्यांचे थंडीपासून संरक्षण होण्यास मदत होते.
- शेतामध्येच उपलब्ध असलेल्या साहित्यापासून गोठ्याची उभारणी करावी. गोठा हा इंग्रजीमधल्या “A” आकाराचा असावा. मध्यभागी गोठ्याच्या छताची ऊंची ही १२ फुट असावी व कडेला ८ फुट ऊंची ठेवावी. गोठ्याच्या सभोवताली ३ फुट ऊंची भिंत असावी.

### ई. आरोग्याचे व्यवस्थापन:

शेळ्यांच्या आरोग्य व्यवस्थापनात लसीकरण व आजारी जनावराची योग्य ती विल्हेवाट लावणे या दोन महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

### उ. पणन व विक्री व्यवस्थापन:

विक्री व्यवस्थापन हे यशस्वी शेळीपालनाचे महत्वाचे सूत्र आहे. बहुतांशी शेळी व्यावसायिक शेळीपालन म्हणजे ईदसाठी बोकड विकणे या एकाच संकल्पनेतून करताना दिसून येतात परंतु दुर्दैवाने ईदच्या बाजारात बोकडांची आवक वाढल्याने अपेक्षित भाव बोकडांना मिळत नाही. शेळीपालन करताना बाजारपेठेचा अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येईल की, स्थानिक बाजारात एक वर्षांच्या आतले व २० ते २५ कि.ग्रॅ. वजनाच्या बोकडाच्या मांसासाठी मागणी आहे. याउलट ईदसाठी १ वर्षांच्या पुढचे व जास्तीतजास्त वजन असणाऱ्या बोकडांची खरेदी केली जाते. म्हणजेच ईदसाठी केलेले बोकड ईदच्या बाजारात विकला गेला नाही तर पुढच्या ईदपर्यंत सांभाळण्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागते आणि याच ठिकाणी शेळीपालकाचा निर्णय चुकतो. म्हणूनच विक्री नियोजन खालीलप्रमाणे करावे,

- १० ते १५ टक्के बोकड हे पैदाशीसाठी विकावेत.
- १० ते १५ टक्के बोकड हे ईदसाठी तयार करावेत.
- ४० ते ५० टक्के बोकड हे स्थानिक बाजारात विक्रीसाठी तयार करावेत.
- बोकडांची विक्री करताना शक्यतो वजनानुसारच करावी. पुढील सूत्र लक्षात ठेवावे, बोकडाचा भाव = बोकडांचे वजन × प्रचलित मटणाचा दर / २
- ईद व पैदाशीचे बोकड / पाठी विकताना जास्त दर ठेवावा.

(संपर्क: +९१ ९८८१५३४१४७)

★ ★ ★